मुंबई विद्यापीठ

क्र. ष. म./ 09 /२०१६–२०१७

परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना सुचित करण्यात येते की, ज्या महाविद्यालयातील प्राचार्यांच्या/शिक्षकांच्या सेवानिवृत्तीचे वय नजिकच्या काळात ६२/६० वर्षे पूर्ण होत आहे किंवा पूर्ण झालेले आहे अशा प्राचार्यांचे/शिक्षकांचे वयोमर्यादित वाढ (६२ ते ६५/६० ते ६२) करण्याकरिताचे परिपूर्ण प्रस्ताव शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०११/(३१६/११) विशी–१ दिनांक २३/११/२०११ अन्वये तात्काळ विद्यापीठाकडे दिनांक २७ मे २०१६ पूर्वी पाठवावेत.

तसेच असेही सुचित करण्यात येते की, अनुदानित महाविद्यालयात विद्यापीठ परिपत्रक क्र. CONCOL/TAU/40/2012-2013 dated 19th March, 2013 अन्वये जे प्राचार्य/शिक्षक प्राध्यापक पदास पात्र आहेत त्यांच्या बाबतची कार्यवाही त्वरेने महाविद्यालय स्तरावर करुन त्यांच्या प्राध्यापक पदाची पुढील कार्यवाही करण्याकरीता त्यांचे प्रस्ताव विद्यापीठाकडे विनाविलंब पाठविण्यात यावेत. सदरबाबत शासन अथवा विद्यापीठ स्तरावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित कागदपत्रांसह विद्यापीठास दिनांक २७ मे २०१६ पूर्वी पाठवावा.

जे संस्थाचालक/प्राचार्य प्राचार्यांचे/शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वयोमर्यादित वाढ (६२ ते ६५/६० ते ६२) करण्याबाबतचे प्रस्ताव तसेच प्राध्यापक पदास पात्र असलेल्या प्राचार्यांच्या/शिक्षकांच्या बाबतचा कार्यवाही अहवाल प्रस्ताव विद्यापीठास सादर करणार नाहीत व जे प्राचार्य/शिक्षक त्यांना मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहतील त्याच्या नुकसानीस संबंधित महाविद्यालयाचे संस्थाचालक/प्राचार्य जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– २० मे २०१६

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– २० मे २०१६

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रत माहीतीस्तव सादर :–

१. मा. श्री हर्षवर्धन तु. जाधव, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२
२. मा. डॉ. धनराज माने, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे – १.
३. मा. सह संचालक, महापालिका मार्ग, मुंबई विभाग, मुंबई – ४०० ००१.
४. मा. विभागीय सहसंचालक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.
५. कुलगुरुंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
६. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
७. स्वीय सहायक, संचालक, बीसीयुडी, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.
८. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताक्रुझ, मुंबई – ४०० ०९८.
९. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ